भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना

# मंथन वार्षिक अंक
# २०१६-१७

**सत्याला सत्य म्हणून आणि असत्याला असत्य म्हणून जाणा.**

— भगवान गौतम बुध्द

**विवेक करीत नाही तो दुराग्रही आहे**
**विवेक करू शकत नाही तो मुर्ख आहे**
**विवेक करण्याचे धाडस करीत नाही तो गुलाम आहे**

— एच. ड्रमॉड

# भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई

# कार्यकारिणी मंडळ

| | |
|---|---|
| मा.श्री.आमदार डॉ. नारायणराव श्रीमंतराव मुंढे | अध्यक्ष |
| मा.श्री. अरविंद श्रीमंतरराव मुंढे | उपाध्यक्ष |
| श्री. प्रा. सत्संग नारायणराव मुंढे | सचिव |
| श्री. सुघोष नारायणराव मुंढे | सहसचिव |
| श्री. अब्दुल कुदूस काझी | कोषाध्यक्ष |
| सौ. माधवी विजय राख | संचालिका |
| सौ. अनुराधा अरविंद मुंढे | संचालिका |
| श्री. छबु नामदेव नवगिरे | संचालक |
| सौ. शितल महेश ढाकणे | संचालक |
| श्री. संजय मारोती गिते | संचालक |
| श्री. श्रीमंत कडूजी तेरे | संचालक |

## महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.आ.डॉ. नारायणराव श्रीमंतराव मुंढे | - अध्यक्ष |
| 2. | प्रा. सत्संग नारायणराव मुंढे | - सदस्य |
| 3. | प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके | - सदस्या/सचिव |
| 4. | श्री. हरीभाऊ नरसिंगराव वाघ | - व्यवस्थापन प्रतिनिधी |
| 5. | श्री.डॉ. अनिल आत्माराम कायंदे | - व्यवस्थापन प्रतिनिधी |
| 6. | श्रीमती डॉ.कविता दिलीप केंदे | - व्यवस्थापन प्रतिनिधी |
| 7. | श्री.अब्दुल कुद्दुस काझी | - का.प्रतिनिधी |
| 8. | प्रा.डॉ.गोवर्धन खेडकर | - का.प्रतिनिधी |
| 9. | प्रा.डॉ.ज्योति धर्माधिकारी | - का.प्रतिनिधी |
| 10. | प्रा.विजय केंदळे | - का.प्रतिनिधी |
| 11. | श्री.भास्कर शिंदे | - शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |

# आमचे श्रध्दास्थान



वै. ह. भ. प. भगवान बाबा

# दोन शब्द

'शिक्षणामुळे सामाजिक न्याय मिळेल' या ब्रीद वाक्याला घेवून भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,गेवराई, जि.बीड संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या मराठवाड्यातील महाविद्यालयापैकी एक आहे. हे महाविद्यालय यावर्षी २४ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत आहे. शैक्षणिक वर्ष १९९१-९२ पासून महिला महाविद्यालय म्हणून स्थापन झाले होते. १९९२-९३ पासून मुला-मुलींचे महाविद्यालय आज नावारूपाला आले आहे.

जालना शहरात बहुजनांचे मुक्त व्यासपीठ निर्माण झाले आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना हे महाविद्यालय आपले वाटते त्यामुळे कला शाखेसाठी शैक्षणिक वर्ष १९३-९४ मध्ये तीन तुकड्याची मागणी करावी लागली. त्यामुळे शासनाने कला शाखेस अतिरिक्त तीन तुकड्या मंजुर केल्या आज प्रथम वर्षात प्रवेश क्षमता चार तुकड्यांची आहे.त्यामुळे कोणत्याच विद्यार्थ्याला प्रवेशापासून वंचित ठेवता येत नाही.

महाविद्यालयात ७० टक्के विद्यार्थी हे ग्रामीण भागातील अत्यंत गरीब व होतकरू मुलांना प्रवेश दिला जातो. त्यांच्यासाठी संस्थेमार्फत 'विद्यार्थी तात्काळ मदत केंद्र' चालवले जाते. या केंद्रामार्फत गरीब विद्यार्थ्यांना मदत केली जाते.

ज्या उद्देशाने संस्थेची स्थापना केली तेच स्फूर्तीस्थान आमचे वडील कै.श्रीमंतराव मुंढे यांचा आदर्श व सामाजिक कार्याची तळमळ डोळ्यासमोर ठेवूनच ग्रामीण भागात राहणाऱ्या माझ्या वडीलांनी ६० मैल दूर अंतरावर डोक्यावर सामानाची पेटी घेवून आम्हा भावंडांना शाळेत घातले. शिक्षण घेत असतांना आम्हा भावंडांना व वडीलांना जो त्रास सहन करावा लागला तो गरीब विद्यार्थ्यांना होऊ नये म्हणून व शिक्षणाचे गांभीर्य लक्षात घेवून समाजातील गोर गरीब व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पाल्यांना त्रास होऊ नये, त्यांची मुले शिकली पाहिजेत व आजच्या स्पर्धेच्या युगात ती टिकली आहे. या ध्येयपुर्ती साठी भगवान शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली.

गेल्या २४ वर्षापासून सातत्याने विद्यार्थी कला व विज्ञान शाखेतून गुणवत्ता यादीत झळकत आहेत. जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान आमच्या महाविद्यालयाला मिळतो. हेच वडीलांच्या उद्दात्त हेतूचे फलीत आम्ही मानतो.

महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा चढता आलेख भविष्यात असाच ठेवण्याचा मी स्वत:प्रती संकल्प केला आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढी बरोबरच महाविद्यालयाचे नाव क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, वादविवाद स्पर्धा त्याचप्रमाचे 'कमवा व शिका' योजना, प्रौढ निरंतर शिक्षण योजना, एन.एस.एस. विभाग, विवेक वाहिनी इ. उपक्रमांमुळे अग्रभागी आहे.

सामाजिक न्यायाची संकल्पना डोळयासमोर ठेवून विद्यार्थ्यांना ज्वलंत प्रश्नाची जाणीव निर्माण व्हावी. यासाठी महाविद्यालय 'कै. श्रीमंतराव मुंढे आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धे'चे आयोजन करते. त्याचप्रमाणे 'सामाजिक न्याय व्याख्यानमाला' महाविद्यालयाच्यावतीने दरवर्षीच आयोजित केली जाते. यामध्ये समाजातील ज्वलंत प्रश्न जसे की - शेतकऱ्यांचा आत्महत्या रोखण्यासाठी जबाबदार कोण ? शासन की जनता ? 'राजकीय नेता म्हणजे गुन्हेगार' असे समाजाला वाटते काय ? होय/ नाही, महाराष्ट्रात नक्षलवाद वाढतो आहे काय? यासारख्या विषयावर तसेच सामाजिक न्याय व सद्यपरिस्थिती, फुले, आंबेडकर व जातीव्यवस्था यासारखे विषय हाताळून शहरात प्रबोधनाचे कार्य करते. युवा वर्गांची मते यानिमित्ताने जाणून घेतली जातात. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते.

सर्व कार्यक्रमात विद्यार्थीनींनाही मोठ्या संख्येने सहभागी होतात. ही आनंदी बाब आहे. या महाविद्यालयात शिक्षण घेवून चांगले अधिकारी निर्माण होतील त्याचबरोबर चांगले नागरीकही निर्माण निर्माण करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाची भविष्यातही वाटचाल चालू आहे.

**डॉ.नारायणराव मुंढे**
संस्थापक अध्यक्ष,
भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई,जि.बीड

# आमचे प्रेरणास्थान



संस्थापक अध्यक्ष

**मा.आ.डॉ. नारायणराव मुंढे**

# भावपुर्ण श्रध्दांजली



स्व.प्राचार्य डॉ. गजमल माळी

## अभिनंदन

प्राचार्य डॉ. गजमल माळी यांनी महाविद्यालयास दिलेला रमा गजमल माळी पुरस्कार विजेते विद्यार्थी — अक्षय राऊत व विद्यार्थिनी — सोनाली पंडित

गाईडशिप मिळाल्याबद्दल अभिनंदन

१. डॉ.खेडकर
२. डॉ.रामपुरे
३. डॉ.दहिफळे
४. डॉ.एम.एस.शिंदे
५. डॉ.उमेश मुंढे



पी.एच.डी.
डॉ. अलिया कौसर


संपादक मंडळ

डॉ.शोभा यशवंते
डॉ.ज्योति धर्माधिकारी
डॉ.अलिया कौसर
डॉ.प्रशांत बंगाळे
डॉ.गिऱ्हे डी.पी.
प्रा.दरगुडे एल.बी.
श्री पी.के.शिंदे

# अनुक्रमणिका


- मंथन भित्तीपत्रक अहवाल
- विद्यार्थी कल्याण विभाग
- सांस्कृतिक विभाग
- क्रिडा विभाग
- सहल कमिटी
- विशाखा समिती
- एन.एस.एस. विभाग
- पर्यावरण समिती
- स्पर्धा परीक्षा
- विवेक वाहिनी
- आजीवन शिक्षण विस्तार व सेवा
- अविष्कार समिती
- रॅगिंग प्रतिबंधक समिती
- नॅक कमिटी
- वाङ्‍मय विभाग
- विद्यार्थ्यांचे साहित्य



# संपादकीय

इक्कीसवी सदी में भारतरत्न डॉ.बाबासाहब आंबेडकरजी को केंद्र मे रखकर हर एक क्षेत्र में काफी चर्चा हो रही है। यह वर्ष उनके शतकोत्तर रजत जयंती का वर्ष होने के कारण अधिक महत्वपुर्ण रहा है। भारतीय नागरिक के दैंनदिन जीवन से संबंधित ऐसा एक भी क्षेत्र नहीं है जिस पर बाबासाहब ने निर्णायक और हितकारक विचार प्रस्तुत नहीं किए है। राजनिती, धर्म, समाज, संस्कृती, अर्थ, विधी, साहित्य आदि सभी क्षेत्र में उन्होंने केवल चर्चा ही नहीं की है तो उस हर एक क्षेत्र में परिवर्तन किया दिखाई देता है।

भारतीय संविधान में व्यक्ति को अभिव्याक्ति स्वातंत्र्य दिया गया है। 'मंथन' के बहाने छात्रों की अभिव्यक्ति जो थी उसे संकलित किया गया है। विद्यार्थियों की अपनी कल्पना शक्ती कें अनुसार उन्होने जो सृजन किया है। वह आपके सामने रखने का विनित प्रयास यहॉ किया गया है।

इस कार्य में महाविद्यालय के संस्थापक अध्यक्ष मा.आ. डॉ. नारायणराव मुंढे, प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके एवं श्री शिंदे बी.के. तथा मेरे सभी सहकारी जनो का सहकार्य रहा है।

धन्यवाद !

प्रा.डॉ.शोभा यशवंते
हिंदी विभाग प्रमुख
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,
जालना

# मनोगत

विद्यार्थी मित्रांनो,

भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाची स्थापना जालना शहरात २७ ऑगस्ट १९९१ साली झाली. या महाविद्यालयामध्ये जालन्याच्या ग्रामीण शहरी तसेच विदर्भ विभागातीलही विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक प्रश्नांची जाणीव, सामाजिक समतेची, एकात्मतेची भावना महाविद्यालयातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी तसेच या मुलांकडून देशाचे उज्वल भवितव्य घडविण्याचे काम या भावी नागरीकांकडून व्हावे हे ध्येय घेवून महाविद्यालय वाटचाल करीत आहे. तसेच गरीब होतकरू, ग्रामीण शहरी व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालय सतत वचनबद्ध राहील. त्याचा परिणाम म्हणून गेल्या बावीस वर्षात शिक्षण घेतलेले विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतांना सामाजिक जाणिवेतून काम करतांना दिसतात. तसेच त्यांच्यात मला एक चांगला माणूस दिसतो.

''शिक्षणामुळे सामाजिक न्याय मिळेल''

या संस्थेच्या ब्रीद वाक्यानुसार महाविद्यालयाने कार्यालयीन अधिक्षक बी.के. शिंदे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी काम करतात. त्यामुळे महाविद्यालयामध्ये शहरी ग्रामीण विद्यार्थी मोठया प्रमाणावर प्रवेश घेतात. मुलींनाही विशेष सुरक्षा पुरविली जाते. पालकांनाही कोणत्याही प्रकारची अडचण येऊ देत नाहीत. त्यामुळेच कनिष्ट महाविद्यालय कला, विज्ञान शाखेतही मोठया प्रमाणावर विद्यार्थी आहेत. त्यापैकी मोठया प्रमाणावर विद्यार्थी मेडीकल इंजिनिअरींग, ईआयटी क्षेत्रातही विद्यार्थी चमकले आहेत. तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी त्याच्या कुटूंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडून अर्धवेळा नोकरी करून महाविद्यालयात येतात. त्यांना प्राध्यापकाच्या शिकवणूकीचा तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमातून व्याख्याने याचा लाभ घेतल्यामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळते. अडचणीतुन मार्ग काढण्याची दिशा मिळते. म्हणून मानवी जीवनात समाजाच्या विकासासाठी उच्च शिक्षण खूप गरजेचे आहे. हे काम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ.नारायण राव मुंढे यांच्या मार्गदर्शनाने आम्ही सर्व कर्मचारी करतो. त्यामुळे अडचणीवर मात करून आम्ही महाविद्यालयाचे विकासात्मकदृष्टया जालना शहरात मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

प्राचार्य

**डॉ.सुनंदा तिडके**

राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

जालना.

# कुशल नेतृत्व



प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके



दिनांक ०८/१२/२०१६ रोजी **APP** च्या प्रमोशन साठी आलेली जागतिक नामवंत 'गुगल टीम' ट्रेसी एल चेन, आलोक तळेकर, गॅरेन चेफली अक्षता रवी विर, निरज जैन, सोमीया मनीवन्नम नागेश्री, हो जूंग ली, सोनम सिंग, रॉल्ट गुट्स्च, डेनिअल वॉल्श, मृणाल शर्मा, अभिजीत पवार, अनुज ठक्कर, इरिस तंग, एरिक निनोमिव्हा, लॅमन हर्ल, प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके व महाविद्यालयातील उपस्थित जन.




सामाजिक न्याय व्याख्यानमालेत बोलतांना डॉ.वसीम पटेल, प्राचार्या डॉ.सुनंदा मिडके, सचिव प्रा.सत्संग मुंढे




जालना नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने मतदार जनजागृती अभियानामध्ये महाविद्यालयातर्फे महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थी व विद्यार्थीनी




मतदार जनजागृती अभियानामध्ये महाविद्यालयातर्फे महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थी व विद्यार्थीनी



दिनांक ०८/१२/२०१६ रोजी आलेल्या 'गुगल टीम' मध्ये ट्रेसी एलचेन, गॅरेन चेउली, रॉल्ट गुट्सच, प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, श्री बी.के.शिंदे



दिनांक ०८/१२/२०१६ रोजी आलेली **APP** च्या प्रमोशन साठी जागतिक नामवंत 'गुगल टीम' मध्ये गॅरेन चेउली, अक्षता उदीविर निरज जैन व विद्यार्थी




मतदार जनजागृती अभियान 'रॅली' व महाविद्यालय, अण्णाभाउ साठे पुतळा, शनिमंदिर चमन व फुलंब्रीकर नाट्यगृहामध्ये पथनाट्याचे प्रयोग




मतदार जनजागृती अभियान मध्ये सहभागी विद्यार्थी, प्रा.खेडकर व प्रा. पालवे

## क्रीडा अहवाल
## शै.वर्ष-२०१६-१७

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद तर्फे आंतर महाविद्यालयीन कीडा स्पर्धेत बॉडीबिल्डींग,ॲथलॅटिक्स स्पर्धेत व कूस्ती स्पर्धेत सहभाग घेतला व अर्चरी स्पर्धेमध्ये आपल्या कॉलेजचा विद्यार्थी

१.धनराज जाधव बी.एस्सी.प्रथम वर्षाचा विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दुसरा आला व त्याची आंतर विद्यापीठ मच्छल पटलम आंध्रप्रदेश (कृष्णा विद्यापीठ) दि.१४ ते १९ फेब्रुवारी-२०१७ खेळण्यासाठी त्याची निवड झाली व त्या स्पर्धेत सहभागी झाला होता.

२. अमेय वसंत दाणी वर्ग १२ वी कला च्या विद्यार्थ्यांने तलवार बाजी स्पर्धेत राज्यस्तरीय रजत पदक मिळविले आहे.

३. १० वी सिनिअर महाराष्ट राज्यस्तरीय नेट बॉल चॅम्पीयनशिप (Sr.No.००६) चौधरी रोहण केवलचंद वर्ग १२ वी कला.

४. Sr.No.००७ चौधरी दिपक केवलचंद वर्ग १२ वी विज्ञान या दोन विद्यार्थ्यांनी नेट बॉल राज्यस्तरीय सहभाग.

५. नंदूरबार २३ ते २५ डिसेंबर-२०१६ स्पर्धेचे ठिकाण एस.ए.मिशन इंगलीश माध्यम हायस्कूल नंदूरबार.

**दुनिया की हर चीज ठोकर लगने से टूट जाया करती है,**
**एक कामयाबी ही है जो ठोकर खाकर ही मिलती है!**




## खरं रूप

उच्चशिक्षि त असुनही
माणुस आज ऑड वाटत
इंटेरियर केलेल्या घरामध्ये
लुगड, धोतर ऑड वाटत
सगळेच पाहुणे सगळेच मेव्हणे
कसे काय पॉश असतील
पार्लर मधुन आणलया सारखे
चिकणे चोपडे कसे दिसतील....
उन्हा तान्हात तळणारी
माणस काळी पडणारच
गरीबनं गांजल्यावर
चेहऱ्याचा रंग उडणारच ....
कुरुप ते नाहीत
कुरुप तु झालास
प्रेम नात्यावर करायंच सोडुन
दिसण्याला भुलुन गेलास
काळी असो गोरी असो
माय ही माय असते
बाप स्वत:ला गाडुन घेतो
म्हणुन तुझी मजा असते
पात्र कितीही मोठे झालं
तरी गंगेच मुळ निसरू नये
सुख असो का :दुख असो
आपल्या माणसाला विसरु नये

नाव : अक्षय राउत
वर्ग : बी.एस्सी. व्दितीय वर्ष

## अनमोल जीवन

आत्महात्या हे सोलुशन नाही
का लेकर तुझी खुळी झाली भारतमाते
जेव्हा केलल्या कष्टाची माती होते
स्वप्न रक्ताळते दुखावलेले मन
आणी आत्महत्या बळी जाते
विसरतात आपल्यशिवाय
विसरतात आपल्याशिवाय
कुटुंबाच होईल काय
बिना बापाच्या पोरांना
कसं पोशवील त्यांची माय
तुम्ही मरता एकदाचे पण
कुटुंब मरुन मरुन जगते
तुम्हाला फारच आवडतो का स्वर्ग
म्हणुन स्वीकारता आत्महात्येया मार्ग
हारु नका लढा आयुष्यासंग
काही तरी देईल तो साथ निसर्ग
जगाला पोशीनारे आज का मरण्याची भीक
मागतात
जिव देवुन काय अडचणी जाईल
खोडा विना कांदयाचं काम होईल
एवढया कवीतान वायां तुम्हात्या
मागच्याची तरी किंचस येईल मरुन नाही
जगुनच यश मते

नाव : .सना बेगम शेख खलील अहेमद
वर्ग : बी.ए. प्रथम वर्ष

## नात्यांचा The End

माणुस काही अहंकार
सोडायला तयार नाही
जगण्याच 'सुत्र' चुकंतय
पण खोडायला तयार नाही
भाऊ काय बहिण काय
नुसता फापट पसारा
कोण कोणला विचारतय
कुणालाही विचारा.... कोणी कोणाकडे
पाहात नाही
कोणी कोणाकडे जाईना
कुणी कोणाकडे येईना
जगलात काय मेलात काय
माया कुणाला येईना
संवेदनशीलता आता
फार कुढ दिसत नाही
बैठकीत किंवा ओसरीवर
गप्पांची मैफिल बसत नाही
पॅकेज ,इनक्रिमेंट ,सॅलरी
इन्व्हेस्टमेंट, विकएन्ड
यातच हल्ली माणसाचा
होत आहे The End
Luxery मध्ये लोळतांना
फाटक गाव नको वाटत
जवळच नातं असलं तरी
सांगयलाही नको वाटत.

नाव: कु. सोनाली पंडीत
वर्ग : बी.ए. व्दितीय वर्ष

## मैत्रीचा सुगंध

ओंजळीत घेवुन समुद्र
कधी दाखवता येत नाही निळयाभोर
गगनाचा
अंत कधी लागत नाही .हाताने काढलेल्या
फुलांना
सुगंध कधी येत नाही, या मैत्री पुर्ण भावनांचा
उल्लेख कधी शब्दात करता येत नाही
मैत्री तुझी माझी असावी पाखरा सारखी
सतत सुखी राहणारी, सुखी राहुण ही
खुप काही बोलणारी, मैत्री तुझी माझी
असावी
धुक्या सारखी क्षणा पुरतीच गारवा देणारी
तशीच ती दवा सारखी अंगावर थंड पांघरुण
जाणारी'
मेल्यावर स्वर्ग नको आम्हास, जिवंत पाणी
पाहिजे,
अंतक्रियेला गर्दी नको माणसांची, जिवंतपणी
मित्रांची साथ पाहिजे
आपल्याला २ गोष्टी कळतात
दोसती केली
तर ती मरेपर्यंत
दुश्मनी केली तर त्याचा विषय संपवे पर्यंत
मैत्री म्हणजे शब्दा शिवाय
एक मेकांच मन जाणुन घेण, चुकलं तर
ओरडणं,
कौतुकाची थाप देणे, एक मेकांचा आधार
बनणं
मैत्री म्हणजे मुळ ,असते एकमेकांना
'आधार' दिला पहिजेत

नाव: हरिदास नागरे
वर्ग : बी.एस्सी. तृतीय वर्ष

## दोस्ती का मोल

बुरे दिनो का एक अच्छा फायदा. अच्छे-अच्छे दोस्तो की परखे जाते है.
दोस्ती कर के देखो, दोस्ती में दोस्त खुदा होता है!
होता हे ये एहसास तब होता जब
दोस्त दोस्त से जुदा होता है.जब
दोसत दोसत जुदा होता हे !
बडी अजीब सी बादशाही है दोस्तो के
प्यार में ना उन्होंने कभी केद में रखा ,न
हम कभी फरार हो पाए
महक दोसती की इश्क से कम नही होती
इश्क से जिन्दगी खत्म नही होती अगर
साथ हो जिन्दगी मे उच्छे दोस्तो का , तो
जिन्दगी जन्नत से कम नही होती
रहे सलामत जिदंगी उनकी, जो मेरी खुशी
की फरियाद करते है. ऐ खुदा उनकी
जिन्दगी खुशियों खुशियों से भर दे, जो मुझे याद
करने मे अपना एक पल बर्बाद करते है
अपनी दोस्ती का बस इतना सा वसुल है,
जो तु कुबुल है. तो तेर सब कुछ कबुल है
वक्त की यारी तो हर कोई करता है मेरे दोस्त मजा तो
जब है जब वक्त बदल जाये पर यार न बदले.
हम आज भी शतरंज का खेल अकेले ही
खेलते है, क्योंकि दोस्ती के खिलाफ
चाल चलना हमे आता नही!
अगर किसी दिन रोना आये, तो कॉल
करना, हसॉने की गारंटी नही देता हुं पर
तेरे साथ रोउंगा जरूर!
मेरी दोस्ती का फायदा उठा लो क्योंकि
दुश्मनी तुम सह नही पाओगे.
दिल मे एक शोर सा हो राहा है बिन आप
के दिल बोर हो राहा है, बहुत कम याद
करते हो आप हमे कही ऐसा तो नही की.
ये दोस्ती का रिश्ता कमजोर हो रहा है.
दूर रहकर हमसे वासता रखना मुलाकात
ना सही, बातो का सिलसिला चालु रखना
छु लो आसमॉ को तुम हमारी यही तमन्ना
हे, पर हम तक वापस आने का रासता बनाये रखना.
अपनी जिदंगी के अलग असुल है, यार की खतिर तो
कांटे भी कबुल है.

## My Friend

A friend is one who walks in
When others walk out
True friends are those rare people who come to find you,
In Dark places and lead you back to the light
To live a life I need a heartbeat
To have a heart beat I need a heart,
To have a heart I need happiness
To have happiness I need
a friend, and for a friend I need

24 sweet hours make I sweet day!
sweet day make I sweet week 4 sweet weeks
friend like 'U' Make my whole like sweet
Sacrifice is greater than love
Character is greater than beauty,
Humanity is greater than friendship

नाव % -सना बेगम शेख खलील अहेमद
वर्ग+ % बी.ए. प्रथम वर्ष



## इक दर्द छुपा हो सीने मे

इक दर्द छुपा हो सीने मे, तो
मुस्कान अधुरी लगती है,
जाने क्यो बिन तेरे, मुझको हर
शाम अधूरी लगती है
कहनी है तुमसे दिल की जो, वो
बात जरुरी लगती है,
तेरे बिन मेरी गजलों मे हर बात
अधूरी लगती है,

दिल भी तेरा हम भी तेरे, एक आस जरुरी है,
अब बिन तेरे मेरे दिल को, हर सास अधुरी
लगता है
माना की जीने के खतिर कुछ
आन जरुरी लगती है,
जाने क्यो 'मन' को तेरे बिन ये
शाम अधुरी लगती है,

मै हैरान हो के सियासतदा के रंग देखता हुं
अक्सर जब बंद कमरो मे इन्हे संग देखता हुँ
कल कोई सियासी गया था मंदिरी-मस्जिदी मे,
आज मै मजहब से मजहब की जंग देखता हुं,
जब से मेरा मुफलिसी से रिश्ता हो गया है
क्यो तब से सब अपनो को मै तंग देखता हुं ;
मै भी बहूत जलता हूं बेबस चिरागो की तरह,
जब हयात हुआ हुआ उसे गैरो के संग देखता हुँ
रात भर छाया रहा मुझपे जिस हुस्न का सुरुर
हो मे आने पे उसे बहुत बदरंग देखता हूँ
रात की रंगीनियो मे सजती है,
जो गंदी गालिया

सुबह उन बदनाम गालियो को मै बेरंग देखता हूँ
सब मुश्किलातो सो भी निराश नाही हूआ है
'मन'
आज भी खुद मु जीने की कछा उमंग देखता हूँ

## म्या बी दोन पैकं कमवल असतं

म्या बी दोन पैकं कमवल असतं
दुकाळाच संकट आल नसंत
तर माय-बापनं साळात धाडल असतं
सावकाराच कर्ज फेडण्यास सारं
जिवन गेल नसत जर म्या
बी दोन पैंक कमबवल असतं

माझ पोर बी मजुरीनं नेल नसत
मोठया साळात घातल असत
जर देवानं महृया नशिबात दारिद्र्य
लिहील नसंत तर, म्या बी दोन पैक
कमवल असतं

सणावाराला बायकोसाठी नव पातळ,
घेतल असंत
पोरीला बी साळात धाडल असतं
घरात कोणाला काय बी कमी पडू नसत
जर म्या बी दोन पैक कमावलं असंत
उदयाच्या दिसाचं चागलं सपनं म्या
बघितल असत जर दोन सबद

कोणाजवळ मन मोकळ बोलता आल
असतं तर म्या माझ सार हाल सांगितल
असंत.

नांव : कु.स्नेहल ढाकणे
वर्ग : बी.ए. प्रथम वर्ष

# ‘मंथन’ भित्तीपत्रकाचे प्रकाशन

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2016-2017 च्या सुरवातीला मागच्या वर्षाची भित्तीपत्रक मार्गदर्शन समिती कार्यरत होती. समीतीप्रमुख प्रा.डॉ. दादासाहेब गिऱ्हे व इतर सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली मंथन भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांच्या हस्ते दि. 27/08/2017 रोजी करण्यात आले.

सप्टेंबर 2016 मध्ये नव्याने मंथन भित्तीपत्रक मार्गदर्शन समिती प्राचार्यांनी शैक्षणिक वर्ष 206-2017 साठी गठीत केली. ज्यामध्ये प्रा. विठ्ठल गाडेकर यांची प्रमुख म्हणुन तर प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी, प्रा.डॉ. आलीया कौसर पठाण, प्रा.डॉ. उमेश मुंढे, प्रा.डॉ. गौतम वाकळे यांची सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुचना फलकावर सुचना लावुन मंथन भित्तीपत्रकाच्या अंकासाठी साहित्य मागविण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वलिखीत साहित्य मंथन समितीकडे जमा केले. यामधुन विद्यार्थ्यांच्या निवडक साहित्यकृतींना भित्तीपत्रकात स्थान देण्यात आले.

मंथन भित्तीपत्रक संपादन मंडळातील विद्यार्थी अक्षय राऊत (बी.एस्सी. द्वितीय वर्ष), धम्मरत्न खरात (बी.ए. द्वितीय वर्ष), कु. सोनाली पंडित (बी.ए. तृतीय वर्ष) राजु पगारे (बी.ए. द्वितीय वर्ष), महादेव आरे (बी.ए. द्वितीय वर्ष) यांनी भित्तीपत्रकाची मांडणी व लेखन केले. कै. अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथील मराठी विभागप्रमुख **प्रा. बसवराज कोरे** यांच्या हस्ते "मंथन" भित्तीपत्रकाचे प्रकाशन दि. 25/02/2017 रोजी करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे यांची विशेष उपस्थिती होती. मंथन भित्तीपत्रक संपादक मंडळातील सर्व विद्यार्थी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थीनी बहुसंख्येने याप्रसंगी उपस्थित होते.



प्रा.बसवराज कोरे ‘मंथन’ भित्तीपत्रकाचे उद्घाटन करतांना विद्यार्थी अक्षय राउत व महादेव मोरे

## विद्यार्थी कल्याण विभागातर्फे 'आरोग्य शिबीर'

विद्यार्थी कल्याण विभाग कार्यरत असून या विभागातर्गंत अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. त्यामध्ये आरोग्य, नोकरी, आपत्ती व्यवस्थापन, व्यक्तिमत्व विकास अशा विविध विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांना अडीअडचणींच्या वेळी मदत केली जाते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत केले जाते व मार्गदर्शनही केले जाते.

विविध उपक्रमांचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य विषयक जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात दिनांक १७ जानेवारी २०१७ रोजी आरोग्य सरंक्षणासाठी आहाराचे महत्व या विषयावर डॉ. अस्मिता उत्तम शिंदे, एम. डी. (आयुर्वेद) जालना यांचे व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. अस्मिता शिंदे यांनी आरोग्य म्हणजे काय, त्यासाठी पोषक आहार व त्याचे महत्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी चांगले आरोग्य ही विकासाची गुरूकिल्ली आहे हे सांगीतले. यावेळी सीमासैन्य दलातील **P.I.** असणारे श्री उत्तम शिंदे उपस्थित होते .

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. शिंदे एन.एस. यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. प्रशांत बंगाळे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.




डॉ.अस्मिता शिंदे, श्री.उत्तम शिंदे, प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके व डॉ. नवनाथ शिंदे व विद्यार्थी

## ''विवके वाहिणी'' अंतर्गत विविध कार्यक्रम

शैक्षणिक वर्ष 2016-2017 या शैक्षणिक वर्षात विवेक वाहिनी तर्फे कार्यक्रम राबवण्यात आले त्याचा अहवाल सादर करीत आहे.

**"आपला विकास आपल्या हाती,**
**हक्क हवेत पण कर्तव्य आधी"**

या उक्ती प्रमाणे विद्यार्थ्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याचे प्रयत्न विवेक वाहिनीच्या माध्यमातून करण्यात येतात. विवेक वाहिनी तर्फे एक विद्यार्थी प्रतिनिधी व एक विद्यार्थीनी प्रतिनिधिची निवड वर्षाच्या सुरुवातीला करण्यात आली.

या विद्यार्थ्यांनी सर्व विद्यार्थ्यांपर्यंत विवेक वाहिनीचे कार्यक्रम राबवण्याचा वर्षभर प्रयत्न करावा असे सांगण्यात येते. त्यांच्या मार्फत उपक्रम राबवण्यात येतात जसे की, विद्यार्थ्यांना एकत्र करुन रोज पाच इंग्रजी शब्द पाठ करुन घेणे तसेच खादीचे कपडे वापरणे व खरेदी करण्यास सांगणे त्याच प्राणे आपल्या धर्मा व्यतिरिक्त इतर धर्माच्या लोकांशी मैत्री करणे व जाणीव पूर्वक संवाद साधने या गोष्टीकडे लक्ष देण्यात येते.

**दि. 19 नोव्हेबर 2016 रोजी महाविद्यालयात विवेक वाहिनी तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले.**

या प्रसंगी अध्यक्ष म्हणून श्री. गिऱ्हे डी.पी. हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.डॉ. अलिया कौसर, प्रा. रामनाथ पालवे, तथा प्रा.डॉ. सविता मुंढे हया होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.डॉ. यशवंते यांनी मानले. या प्रसंगी प्रा. पालवे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला व आजही महाराजाचे विचार कसे उपयुक्त आहे हे ही सांगितले या प्रसंगी विद्यार्थी प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**दि. 10 जानेवारी 2017 रोजी ॲड. कल्पना त्रिभूवन यांनी महिलांच्या प्रश्ना बाबत सखोल अभ्यासपूर्ण व्याख्यान केले.**

विद्यार्थ्यांनी प्रश्न केले त्यांच्या प्रश्नांना कायद्याच्या भाषेत ॲड. कल्पना त्रिभूवन यांनी उत्तरे दिली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मोठया संख्येने उपस्थित होते. हे चर्चासत्र चार तास चालले या प्रसंगी प्रा.डॉ. ज्योति धर्माधिकारी, विवेक वाहिणी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.यशवंते एस.जे., प्रा.डॉ.सविता मुंढे, प्रा.डॉ.अलिया कौसर, प्रा.गायकवाड शोभा, प्रा.डॉ. विक्रम दहिफळे, प्रा.नागरे डी.टी., इ. प्राध्यापक उपस्थित होते. हा कार्यक्रम घडवून आणण्यामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांचे सहकार्य लाभले.

**दि. 12 जानेवारी 2017 रोजी जीजामाता स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.**

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या अध्यक्ष म्हणून होत्या या प्रसंगी प्रमूख पाहुणे म्हणून प्रा. जया वडोदे व प्रा. डॉ. दहिफळे सर होते. या प्रसंगी त्यांनी जीजामाता व स्वामी विवेकानंद बद्दल आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्यांनी जीजाऊ चा आदर्श घेण्याचे आव्हान केले. सूत्र संचलन प्रा.जैस्वाल यांनी केले तर आभार प्रा.डॉ. यशवंते शोभा यांनी मानले.

**दि. 23 फेब्रुवारी 2017 रोजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतिच्या कार्यक्रम विवेक वाहिनीतर्फे घेण्यात आली.**

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके हया अध्यक्ष म्हणून होत्या तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.डॉ. यशवंते एस.जे. हया होत्या या प्रसंगी सूत्रसंचालन प्रा. डॉ. सविता मुंढे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. आलिया कौसर यांनी मानले. या प्रसंगी सुभाषचंद बोस यांच्या जिवनावर पाहूण्यांनी प्रकाश टाकला तर अध्यक्षिय समारोपात सुभाषबाबूचे योगदान लक्षात ठेवून प्रत्येक भारतीयांनी आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडले पाहिले असे आवाहन केले.

विवेक वाहिणीचा कार्यक्रमाची सुरुवात करतांना डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे स्मरण केल्या जाते कारण ते या विवेक वाहिणीचे संस्थापक होते. विद्यार्थ्यांमध्ये विवेकी विचार रुजविण्याचे महत्वाचे कार्य या विवेक वाहिणी मार्फत केल्या जाते.

**विवेक वाहिणी विद्यार्थी प्रतिनिधी :** मयुर गोरखनाथ गोगडे, बी.ए. व्दितीय वर्ष

**विवेक वाहिणी विद्यार्थीनी प्रतिनिधी :** कु. सना बेगम शेख खलील अहमद, बी.ए.प्रथम वर्ष

**वेवेक वाहिणी कमीटी :**

1. प्रा.डॉ.यशवंते एस.जे.
2. प्रा.डॉ. सविता मुंढे
3. प्रा.डॉ.गिऱ्हे डी.पी.
4. प्रा.डॉ.अलीया कौसर
5. प्रा. सचिन जयस्वाल

# राष्टमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,जालना.

## कामाच्या ठिकाणी महिलांचा होणार लैंगिक छळ

(प्रतिबंध,मनाई आणि निवारण)

आत्याचार विरोधी कायदा, २०१३.

**अहवाल**

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विशाखा मार्गदर्शक तत्वे अनुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध,मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी आमच्या महाविद्यालयात अंतर्गत महिला तकार निवारण समिती (Internal Complaint Committee-ICC) वर्ष-२०१६-१७ वरील विषय व संदर्भानुसार कायदयाबददल जागृती निर्माण करण्याच्या उददेशाने दि.२७/०२/२०१७ या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

आमच्या महाविद्यालयात (विशाखा मार्गदर्शक तत्वे अनुसार) दि.२७/०२/२०१७ या दिवसी विदयार्थ्यासाठी महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन केलेले होते. या कार्यशाळेचा उददेश कामाच्या ठिकाणी महिलांचा होणार लैंगिक छळ तसेच लैंगिक छेडछाडीला प्रतिबंध घालण्यासाठी तरुण मुला-मुलींसाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत लैंगिक छेडछाड म्हणजे काय तसेच मुलींसाठी त्याच्या संरक्षणार्थ काही हिताच्या सुचनाही देण्यासाठी व मुलांसाठीही काही हिताच्या सुचना दिल्या गेल्या.त्यासाठी या कार्यकमात Push/ICC अंतर्गत जालना जिल्हयाचे समन्वयक अॅड.पी.जे.गवारे त्यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन पर मुलामुलींच्या छेडछाडीविषयी तसेच शासनाने केलेल्या त्या संदर्भातीत कायदयाविषयी सखोल माहिती दिली. तसेच विदयार्थ्यांना चित्रफीती दाखवुन त्या संदर्भातील जनजागृती विषयी मार्गदर्शन केले.

तसेच या कार्यकमाचे दुसरे पाहुणे अॅड.कल्पना त्रीभूवन यांनी महिलांच्या विविध समस्यांची माहिती देऊन महिला विषयक कायदयाची ओळखही पटवुन दिली. तसेच स्त्री-पुरुष समानतेसाठी कायदयाची आवश्यकता आहे पण पुरुषी माणसिकता बदलण्याचीही महिलांविषयीची गरज आहे. त्यासाठी मनाची तयारी होणे हाच मोठा कायदा आहे.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके मॅडम यांनी मुलींनी उच्च शिक्षण घेऊन समाजात स्वत:चे स्थान निर्माण करावे मनात कोणत्याच प्रकारचा न्युनगंड बाळगु नये आपले प्रश्न आपणच धीट मनाने सोडवावेत व मुलींनी छेडछाडीच्या संदर्भात स्पष्ट नकार,घरच्यांना याविषयीची लवकर माहिती देणे व आई-वडीलांची मदत घेणे व मुलांनीही आपली सहचारिणी मैत्रीण या स्वच्छ मनाने मुलींकडे पाहणे व तिच्या भावना समजावुन घेणे. या कार्यकमाचे प्रास्ताविक डॉ.सविता मुंढे यांनी महिला आयोगाने दिलेल्या तरुण मुलामुलींसाठी हिताच्या सुचना सांगितल्या व विदयार्थ्यांना दिल्या. निकोप व

भयमुक्त परिसर वातावरणात शिक्षण घेणे हा विदयार्थ्यांचा अधिकार आहे म्हणुन तरुण मुलांमुलींने एकमेकांना चांगल्या भावनेतुन सहकार्य करणे जेणेकरुन निकोप वातावरण निर्माण राहिल.

यावेळी विदयार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी प्रमाणपत्रही वाटप केले व त्यात त्यांना त्यादिवशी पुर्णपणे सामावुन घेतले. या कार्यक्रमासाठी सुत्रसंचलन डॉ.शोभा यशवंते तर आभार प्रदर्शन प्रा.षाजी सहदेवन तसेच या कमिटीतील सदस्या डॉ.आलिया कौसर यांनी व श्री.बी.के.शिंदे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खूप सहकार्य केले. या कार्यक्रमात विदयार्थी ,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिन हा महाविद्यालयात विशाखा समिती (ICC) व्दारा कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्ताने कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अॅड.शैलजा वाडेकर होत्या. यांनी विदयार्थ्यांना विशाखा समितीची सविस्तर माहिती व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्त्री ही अबला नसून ती सबलाच आहे. तिने तिच्या आत्मविश्वासावर सर्व क्षेत्रात उंच भरारी आज मारली आहे. म्हणून मुलींनी कुणालाही न घाबरता आपल्यावर कितीही संकट आले तरी शिक्षण हे घेतलेच पाहिजे. दुस-या प्रमुख पाहुण्या शैला पोपळघट यांनी बचत गटाच्या माध्यमातून स्त्रियांना वेगवेगळे उदयोग करण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे तिचा अर्थिक स्तरही उंचावत आहे.त्यामुळे तिच्या निर्णय क्षमतेला आज महत्व प्राप्त होत असलेले दिसून येते.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच प्राचार्या डॉ.तिडके मॅडम म्हणाल्या की, महिलांनी आपले संरक्षण स्वत: केले पाहिजे अन्याया बददल बंड केले पाहिजे. महिलांनीची मदत केली पाहिजे.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.धर्माधिकारी मॅडम व आभार डॉ.आलिया मॅडम यांनी मानले. यावेळी विशाखा समितीतील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच याप्रसंगी विदयार्थी व विदयार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी विदयार्थ्यांनी सर्व महाविद्यालयातील कर्मचा-यांनी भयमुक्त वातावरणात शिक्षण घेण्याचा व छेडछाडी मुक्त वातावरण ठेवण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करु ही प्रतिज्ञा घेतली.



# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन दि .०१/०२/२०१७ रोजी पार पडले या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके ह्या होत्या व प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.रोमा गेही व प्रा.माधुरी पाटोळे (**College Of Engg. & Technology**) ह्या होत्या.

पहुण्यांनी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेविषयी सविस्तर माहिती मुलांनी दिली व या स्पर्धेच्या युगात टिकुन राहण्यासाठी कार्यतत्पर राहावे असा संदेश दिला. नवनवीन येणाऱ्या कोर्सची माहिती व त्यासाठी लागणारी पात्रता व परीक्षा यावर मार्गदर्शगन केले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी केला. येणारा काळ हा स्पर्धेचा आहे व त्या स्पर्धेतून आयुष्याच्या स्पर्धेत यशस्वी व्हा व सर्वोच्च शिखर गाठा असा संदेश मुलांनी त्यांनी दिला.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्पर्धा परीक्षा समिती व सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. यामध्ये प्रा. ज्ञानेश्वर नागरे, प्रा.डॉ. शोभा यशवंते यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.सतोष देशपांडे यांनी केले तर आभार प्रा. षाजी सहदेवन यांनी मानले.




स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करतांना प्रा.माधुरी पाटोळे



विशाखा समितीअंतर्गत कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ या विषयी दि. २७/०२/२०१७ रोजी घेतलेल्या कार्यक्रमात प्रा.षाजी सहदेवन, डॉ.यशवंते तसेच प्रमुख पाहुणे ॲड.गवारे, ॲड.कल्पना त्रिभुवन, प्राचार्यो तिडके मॅडम व डॉ. अलियाकौसर




दि.०८/०३/२०१७ या दिवशी जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात बसलेले ॲड.शैलजा वाडेकर, सौ.शैला पोपळघाट, प्राचार्या तिडके मॅडम, प्रा.पंडित सर व पालकवृंद




जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने महाविद्यालयात कार्यक्रम प्रसंगी ॲड.भुतेकर, ॲड,राहुल चव्हाण, ॲड,विपुल देशपांडे, मा.डी.बी. म्हालटकर, दिवाणी न्यायाधीश सत्यशिला कटारे , प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके




विवेक वाहिनी प्रमुख प्रा.डॉ.शोभ यशवंते, प्रा.डॉ.धर्माधिकारी, ॲड.कल्पना त्रिभुवन, प्रा.डॉ.अलिया, प्रा.डॉ.सविता, प्रा.डॉ.दहिफळे व प्रा.नागरे डी.टी.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
## शैक्षणीक सत्र २०१६—१७ नियमित व विशेष शिबीर
## कार्यक्रम अहवाल.

दिनांक १ जुलै ते ७ जुलै या कालावधीमध्ये शासनाच्या उपक्रमानुसार महाविद्यालय परीसरात प्राचार्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे झाडे लावण्यात आली

दिनांक ०१/०८/२०१६ लोकमान्य टिळक यांचा स्मृती दिन व लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. व प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ.शोभा यशंवते या होत्या. यांनी स्वयसेवकाला अण्णाभाऊ विषयीचे सामाजिक चळवळीचे विचार व ग्रथसंपदा वाचक विषयक गोडी यावर मार्गदर्शन केले.व तसेच लोकमान्य टिळक यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्या. तिडके यांनी केला. स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत काहिंनी आपले विचार व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.विजय केंदळे व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.संतोष देशपांडे यांनी केले.स्वयसेवकांना अल्पोहार देउन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी प्रा.डॉ.सुनंदा तिडके यांच्या अध्यक्षते खाली रेड रीबन कल्बची स्थापना करण्यात आली.यामध्ये आवत्ती व्यवस्थापन यावर स्वयंसेवकांना प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ.नवनाथ शिंदे यांनी मार्गदर्शन केले.चहापणी नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.ज्ञानेश्वर नागरे व आभारप्रदर्शन प्रा.डा.सोमीनाथ खाडे यांनी केली.

दिनांक ०९/०८/२०१६ रोजी क्रांती दिन मोठया उत्साहात साजरास करण्यात आला.या कार्याक्रमास अध्यक्ष म्हणुन प्रा.डॉ.सुनंदा तिडके व प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ.नवनाथ शिंदे हे होते.क्रांती विषयक विचार डॉ.शिंदे यांनी मांडले.व विद्यार्थ्याना क्रांतीविषयी महत्व पटवुन दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.सचिन जैस्वाल व आभार प्रदर्शन प्रा.डॉ. शोभा यशंवते यांनी केले.

दिनांक १५/०८/२०१६ स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडावदन संस्थेचे संस्थ. ापक अध्यक्ष मा.डॉ.नारायणराव मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.व नंतर स्वंयसेवकांसाठी विविध स्पर्धा घेउन कार्यक्रमाची सांगता अल्पोहार व चहापाणी देउन करण्यात आली.

दिनांक २३/०८/२०१६ विद्यावीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त उच्च शिक्षण कार्यशाळा या विषयावर डॉ. नवनाथ शिंदे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवनाथ शिंदे हे होते. यांनी स्वंयसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व पटवून दिले व विद्यर्थ्यांनी जास्तीत जास्त राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होउन देश सेवा करावी हे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले व आभारप्रदर्शन प्रा.ज्ञानेश्वर नागरे यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या शेवटी चहापाणी व अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक ३०/०८/२०१६ महा अवयवदान अभियान २०१६ यासाठी दिनांक ३० ऑगस्ट रोजी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्या रॅलीमध्ये स्वंयसेवकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला व अवयवदानाचे महत्व या विषयी घोषणा व नागरिकांशी अवयवदानासंबंधी चर्चा व महत्व पटवून दिले.

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी अवयवदान या विषयावर विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध अवयवांच्या रांगोळ्या, अवयवदानाविषयी निबंध व वक्तृत्व स्पर्धा यांचे महाविद्यालयामध्ये आयोजन प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी अवयवदान नोंदणी शिबीरामध्ये महाविद्यालयातील काही प्राध्यापक व काही विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला.

दिनांक ०५/०९/२०१६ शिक्षक दिन हा राष्ट्रीय स्वंयसेवकांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. यांप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके व प्रमुख पाहुणे म्हणून प्र. भिमराव वांग हे होते. यांनी शिक्षकाचे महत्व व येणारा आधुनिक काळ व त्यामधील शिक्षक वि शिक्षकांची भुमिका यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी चहापाणी व अल्पोपहार देण्यात आला व विद्यार्थ्यांनी विविध वर्गांमध्ये जाउन काही विषय शिकवले.

दिनांक १७/०९/२०१६ मराठवाडा मुक्ति संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ. नारायणराव मुंढे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यांनतर मरा. ठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान प्रा. डॉ. सविता मुंढे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या या कार्यक्रमामध्ये मराठवाडा मुक्त करण्यासाठी झालेल्या बलिदानाची महती त्यांनी सांगितली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.संतोष देशपांडे व आभारप्रदर्शन डॉ. गौतम वाकळे यानी केले.

दिनांक २४/०९/२०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. नवनाथ शिंदे व प्रा.डॉ. दादासाहेब गिऱ्हे हे होते. यांनी स्वंयसेवकाना राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे महत्व पटवून दिले. स्वंयसेवकांनी या कार्यक्रमामध्ये श्रमदान करून महाविद्यालय परिसर स्वच्छ करून उस्फुर्त सहभाग नोंदवला.

दिनांक ०२/०६/२०१६ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनंदा तिडके या होत्या व प्रमु ख पाहुणे म्हणून डॉ. बापुराव म्हस्के व डॉ. प्रमोद चव्हाण हे होते. यांनी महात्मा गांधी  व लालबहादूर शास्त्रीविषयी त्यांच्या योगदानाचे विचार व अर्थविषयक, कृषिविषयी व सरंक्षणासंबंधी विचार मांडले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. रामनाथ पालवे यांनी केले व आभारप्रदर्शन प्रा. डॉ. उमेश मुंढे यांनी केले.

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्य क्षस्थानी प्रा. डॉ. सुनंदा तिडके या होत्या व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.विक्रम दहिफळे हे होते. यांनी राष्ट्रीय एकात्मता ही काळाची गरज आहे व त्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थाने विलिनीकरणाची भूमिका याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर नागरे व आभार प्रदर्शन प्रा. संतोष देशपांडे यांनी केले.

दिनांक २६/११/२०१६ रोजी संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.  याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. गोवर्धन खेडकर हे होते. यांनी आपल्या भाषणात संविधानाची महती पटवून दिली व संविधानाची गरज, दैनंदिन जीवनात महत्वाची आहे हे सांगितले. शेवटी आभार प्रदर्शन प्रा.डॉ. संतोष देशपांडे यांनी केले व सुत्रसंचालन प्रा.सचिन जैस्वाल यांनी केले. शेवटी चहापाणी व अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक २४/११/२०१६ रोजी मतदान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी शहराच्या विविध ठिकाणी पथनाट्य सादर केली. व यानंतर संबंधित पथनाट्याचे प्रदर्शन फुलंब्रीकर नाट्यगृहात केले. या कार्यक्रमाची सांगता स्वंयसेवकांना अल्पोपहार व चहापाणी करून करण्यात आले.

दिनांक २८/११/२०१६ महात्मा फुले पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविदयलयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या व प्रमुख पाहूने  म्हणुन प्रा. शोभा गायकवाड या होत्या. पाहुण्यांनी भाषणात महात्मा फुले यांच्या कार्याची माहिती सांगितली व महात्मा फुले सामाजिक शैक्षणिक कार्य यावर प्रकाश टाकला.

दिनांक ०१/१२/२०१६ जागतिक एड्स दिनानिमित्त सार्वजनिक रॅलिमध्ये सहभाग नोंदवला व महाविद्यालयातील कार्यक्रमामध्ये अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनंदा तिडके व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.पुनम अग्रवाल, रक्षा घुगे (फार्मासिस्ट), सीमा गवई (**A.N.M.**) व प्रा. सोपान चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमातील पाहुण्यांनी एड्स दिनोचे महत्व व एड्स हा महाभयानक रोग आहे. त्या रोगाचे औषध उपलब्ध नाही. एड्  सची भिती बाळगू नका, माहिती जाणून घ्या  असे प्रतिपादन केले. डॉ. चव्हाण यांनी एच.आय.व्ही. मुळे एड्स होतो त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ति कमी होते व या एड्सचा उगम या विषयी माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्यांनी एड्सची जनजागृती करा, रक्तदान करतांना किंवा रक्त घेतांना तपासून घ्या असे सांगितले. एड्सचा प्रसार जनजागृतीमुळेच थांबेल असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. संतोष देशपांडे यांनी केले व आभारप्रदर्शन डॉ. गोवर्धन खेडकर यांनी केले.

दिनांक ०६/१२/२०१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनंदा तिडके या होत्या व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. गौतम वाकळे, प्रा. अलिया कौसर, प्रा.डॉ.प्रमोद चव्हाण हे होते. डॉ. चव्हाण यांनी आपल्या भाषणात आंबेडकरांचे सामाजिक व शै क्षणिक विचार यावर मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. वाकळे यांनी आंबेडकरांच्या जीवनाचे थोडक्यात सार मांडले व सविधानाचे महत्व पटवून दिले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्यांनी आंबेडकरांच्या विचारांची काळाला गरज आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सुचसंत्रालन प्रा. नवनाथ शिंदे यांनी केले. व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी यांनी केले.

दिनांक २०/१२/२०१६ संत गाडगे बाबा पुण्यतिथी यांप्रसगी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. शोभा यशवंते या होत्या व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विजयमाला घुगे, प्रा. सचिन जैस्वाल हे होते. पाहुण्यांनी आपल्या भाषणात संत गाडगे बाबा यांचे क्रातीकारी विचार, समाजप्रबोधन व अंधश्रध्दा खुलचट कल्पना यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोपात प्रा.डॉ. यशवंते यांनी गाडगे बाबांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा .डॉ. संतोष देशपांडे यांनी केले व आभारप्रदर्शन प्रा.डॉ. अलिया कौसर यांनी केले.

दिनांक २६ जाानेवारी २०१७ रोजी झेंडावंदन महाविद्यालयााचे संस्थापिक अध्यक्ष मा. नारायणराव मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन कर्मचारी व प्राध्यापक तसेच रा.से.यो.चे स्वंयसेवक उपस्थित होते.

<u>रक्तदान शिबीर :</u>

दिनांक २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जनकल्याण रक्तपेढी जालना व राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्रा. डॉ. सुनंदा तिडके यांनी केले यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी उस्फुर्तपर्ण रक्तदान केले. जवळ जवळ ५० लोकांची रक्ततपासणी यामध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण याचे मोजमाप करण्यात आले व २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना अल्पोपहार व चहापाणी करण्यात आले.





विशेष श्रम संस्कार शिबीर मध्ये बंधारा तयार करतांना स्वयंसेवक



विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे बोरखेडी, ता.जि. जालना येथे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना समाजसेविका मा.अनया अग्रवाल.



मौजे बोरखेडी, ता.जिल्हा जालना येथे रा.से.यो. विशेष श्रम संस्कार शिबीर मध्ये बंधारा केल्यानंतर स्वंयसेवक



मौजे बोरखेडी, ता.जि. जालना येथे रा.से.यो. विशेष श्रम संस्कार शिबीर मध्ये बंधारा केल्यानंतर महाविद्यालयाच्या फलकासह स्वंयसेवक




''सपान'' नाटकाच्या व्यासपीठावरील सहभागी कलाकार



# युवक महोत्सव अहवाल

## शै.वर्ष-२०१६-२०१७

दिनांक १९ ते २२ सप्टेंबर २०१६ रोजी केंदिय युवक महोत्सव डॉ.बा.आं. मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद व तुळजाभवानी अभियांत्रीकी महाविद्यालय, तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या युवक महोत्सवाची घोषणा होती **अंकूर किरण आशेचा वेध आकाशाचा** तुळजापूर येथे आयोजित केलेल्या या केंदिय युवक महोत्सवात आपल्या महाविद्यालयाचा संघ पाठवण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी वेगवेगळया स्पर्धामध्ये आपला सहभाग नोंदवला जसे की, इंस्टॉलेशन, मूक अभिनय,रांगोळी, चित्रकला,फोटोग्राफी अशा स्पर्धामध्ये सहभाग घेतला.

दि. १८ सप्टेंबर २०१६ रोजी दुपारी २.०० वाजता जालन्याहुन संघ घेऊन निघालो तर रात्री ९:०० वा. तुळजापूर येथे पोहचलो त्या दिवशी ऑफिसला सूचना दिली व आपली उपस्थिती नोंदवली.

दि.१९ सप्टेंबर या दिवशी शोभा यात्रेत सहभागी झालो. सकाळी ८ वाजता ही शोभायात्रा शिवाजी चौक ते तुळजाभवानी मंदिर मार्गे पॉलिटेक्नीक कॉलेज येथे परत आली. या शोभा यात्रेत विदयार्थ्यांनी हम सब एक है, चा देखावा सादर केला. घोषणा दिल्या व महाविद्यालयाचे युवक महोत्सवाचा लोगो असलेले बॅनर धरुन सर्व शोभा यात्रा संपेपर्यंत सहभाग घेतला. नंतर नास्ता वै. करुन विद्यार्थ्यांनी आपल्या निवासस्थानावर थोडा आराम केला व नंतर रांगोळी स्पर्धेसाठी परत स्पर्धक स्पर्धेच्या ठिकाणी आले.

दि. २० सप्टेंबर २०१६ रोजी मूक अभिनय या स्पर्धेत सहभाग नोंदवला व सादरीकरण केले. स्पर्धकांनी आपले सादरीकरण अत्यंत प्रभावीपणे केले व प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. या मूक अभिनयाचा विषय होता **ऑनलाईन शॉपींग व ट्रेडिंग** . सर्व स्पर्धा आज संपल्या कुपनवर दिलेल्या भोजनाचा आस्वाद घेऊन विद्यार्थी आपआपल्या निवासस्थानी पोहचले.

दि.२१ सप्टेंबर २०१६ रोजी बक्षीस वितरणाचा कार्यकम होता व कुलगुरुंचे भाषण ऐकण्यासाठी सर्वजण मुख्य पेंडॉल मध्ये जमलो. एकंदरीत कार्यकम व्यवस्थीत पार पडला. व नंतर परतीच्या प्रवासासाठी निघालो.

या युवक महोत्सवासाठी विद्यार्थ्यांना वेशभूषा व इतर साहित्य घेऊन देण्यात आले.बॅनर तयार करुन घेतले व राहणे, खाणेपिने या विषयक सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्याकडुन कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही व महाविद्यालयाची प्रतिमा कशी उंच राहिल याची काळजी घेण्यात आली. यासाठी युवक महोत्सव समीती सक्रिय राहिली.

**युवक महोत्सव समीती**

१. प्रा.डॉ. शोभा यशवंते
२. प्रा. ज्ञानेश्वर नागरे
३. प्रा.डॉ.नवनाथ शिंदे
४. प्रा.डॉ. उमेश मुंढे
५. प्रा. शेख वहाब
६. श्रीमती. खेडकर एस.बी.

महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ.नारायणरावजी मुंढे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांच्या सहकार्याने हा युवक महोत्सव यशस्विरीत्या साजरा झाला.






केंद्रीय युवक महोत्सवात संघप्रमुख प्रा.नागरे डी.टी., प्रा.डॉ. शोभा यशवंते व सहभागी विद्यार्थी




केंद्रीय युवक महोत्सवात – मुक अभिनय सादर करतांना विद्यार्थी अक्षय राउत, चरण साळवे व राजीव पगारे

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,जालना.

## वाङमय मंडळाचा वार्षिक अहवाल

## शै.वर्ष-२०१६-१७

महाविद्यालयात वाङमय मंडळा अंतर्गत दि.१४ सप्टेंबर-२०१६ रोजी हिंदी दिवस या कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यकमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.डॉ.शोभा यशवंते व प्रा.डॉ.अभिमन्यू बिक्कड हे होते. या प्रसंगी मान्यवरांनी राष्टभाषा म्हणून हिंदी भाषेचे महत्व विषद केले.

वाङमय मंडळा अंतर्गत महाराष्ट शासन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या परिपत्रकानुसार मराठी भाषा सप्ताह व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यकम घेण्यात आले. दि.१७/०२/२०१७ रोजी महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शन हा कार्यकम घेण्यात आला. याप्रसंगी उदघाटक म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.विकम दहिफळे हे उपस्थित होते. यावेळी , मान्यवरांनी ग्रंथ हेच गुरु मानुन धावपळीच्या जीवनात वाचन संस्कृती जोपासने महत्वाचे आहे. ज्ञान घेऊन तरुणांनी ज्ञान संपन्न झाले पाहिजे अशी भावना व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व बहुसंख्य प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

दि. २०/०२/२०१७ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज, वि.दा.करंदीकर,कवी मंगेश पाडगांवकर,बालकवी,आरती प्रभू, बहिणाबाई चौधरी, नामदेव ढसाळ, फ.मु.शिंदे, इंदजीत भालेराव यांच्या काव्याचे वाचन करण्यात आले. विविध मान्यवर कवींच्या कविता विभागात लावून महाविद्यालयात काव्यवाचनाचा जागर घालण्यात आला.

दि. २३/०२/२०१७ रोजी वाङमय मंडळा अंतर्गत मराठी भाषा सप्ताह व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा दिनाचे महत्व या विषयावर जेष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंथन या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. या कार्यकमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.दादासाहेब गि-हे हे होते. कार्यकमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. उमेश मुंढे यांनी केले आणि आभार प्रा.विठ्ठल गाडेकर यांनी मानले.

